| MHKO050004862007 | नियमित दिवाणी दावा क्र.६४/२००७.<br>नि.क्र.९७ वरील आदेश.<br>बाबुराव कृष्णा पाटील व इतर विरुध्द आनंदा मारुती निगडे व इतर. |
|---|---|

वादी यांनी मयत वादी क्र.१ व २ तसेच मयत प्रतिवादी क्र.४, ९ व १३ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

२. वादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, दावा निरंतर मनाई हुकूम होऊन मिळण्यासाठी दावा दाखल केला असून दाव्यातील वादी क्र.१ व ३ व प्रतिवादी क्र.४, ९ व १३ हे किरकोळ दिवाणी अ.क्र.४४/२०१२ चे काम चालू असताना मयत झाले आहेत. वादी क्र.१ व ३ व प्रतिवादी क्र.४, ९ व १३ यांचे वारस कि.दि.अ.क्र.४४/२०१२ चे कामी मुदतीत रेकॉर्डवर आणले आहेत. परंतु, प्रस्तुतचे काम रेकॉर्डवर नसल्याने दाव्यात वादी क्र.१ व ३ तसेच प्रतिवादी क्र.४, ९ व १३ यांचे वारस रेकॉर्डवर येण्याकरिता विलंब झाला आहे. सदरचा मुळ दावा मा.न्यायालाने ता.०३/०७/२०१२ रोजी काढून टाकला होता. त्यानंतर वादी यांनी विलंब न करता सदरचा दावा पुन्हा फैलावर घेण्याकरिता कि.दि.अ.क्र.४४/२०१२ हा अर्ज दाखल करुन तो अर्ज दि.१८/०७/२०२४ रोजी मंजूर झाला आहे. त्यामुळे कि.दि.अ.क्र.४४/२०१२ हा अर्ज मा.न्यायालयात प्रलंबित असताना वादी क्र.१ व २ व प्रतिवादी क्र.४, ९ व १३ हे मयत झाले आहेत. त्यामुळे सदर वादी क्र.१ व २ तसेच प्रतिवादी क्र.४, ९ व १३ यांचे मुळ दाव्यात वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. सदर कि.दि.अ.क्र.४४/२०१२ मध्ये सदर वादी व प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर घेतले आहेत.

३. वादी यांनी अर्जात पुढे असे कथन केले की, वादी क्र.१ हे दि.२१/०६/२०१५ रोजी मयत असून त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याकरिता ८ वर्षे ३ महिने व २४ दिवस इतका विलंब, वादी क्र.३ हे दि.२५/०५/२०१३ रोजी मयत झाले असून त्यांचे वारस रेकॉर्डवरती घेण्याकरिता १० वर्षे ०४ महिने १८ दिवस इतका विलंब झाला आहे. प्रतिवादी क्र.४ शेवंता भ्र. गणपती निगडे हे मयत झाले आहेत. परंतु, त्यांच्या मृत्युची नोंद इचलकरंजी नगरपालिकेकडे झालेली नाही व तसा दाखला इचलकरंजी नगरपरिषदेने दि.३१/०८/२०१२ रोजी दिला आहे. त्यामुळे त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस ११ वर्षे ०१ महिना ११ दिवस इतका विलंब झाला आहे. प्रतिवादी क्र.९ अनुसया भ्र. शंकर जाधव ह्या दि.०२/०७/२०१८ रोजी मयत झाल्या असून त्यांच्या देखील मृत्युची नोंद झालेली आहे व तसा दाखला इचलकरंजी नगरपारिषदेकडे दि.३१/०८/२०१२ रोजी दिलेला

आहे. त्यामुळे त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास ११ वर्षे ०१ महिना ११ दिवस इतका विलंब झाला आहे. प्रतिवादी क्र.१३ हे दि.०२/७/२०१८ रोजी मयत झाले असून त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याकरिता ०५ वर्षे ०३ महिने १० दिवस इतका विलंब झाला आहे. सदरचा विलंब हा जाणूनबुजून केला नसून कि.दि.अ.क्र. ४४/२०१२ हा अर्ज प्रलंबित असल्यामुळे व सदरचा दावा रेकॉर्डवर नसल्यामुळे मुदतीत वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. त्यामुळे सदर वारस रेकार्डवर घेण्याकरिता विलंब झाला आहे. सदर झालेला विलंब माफ न झाल्यास वादी यांचे अतोनात नुकसान होणार आहे व तांत्रिक अडचण निर्माण होणार आहे.

**४.** वादी यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा व वादी क्र.१ व २ तसेच प्रतिवादी क्र.४, ९ व १३ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ करण्यात यावा.

**५.** प्रतिवादी यांना वारंवार संधी देऊन देखील प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले नाही. सबब, दि.१७/०२/२०२५ रोजी प्रतिवादी विरुध्द विनाम्हणणे आदेश पारीत करण्यात आला.

**६.** वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान चालू असलेला प्रस्तुत मुळ दावा क्र.६४/२००७ माझे पुर्वपिठासिन अधिकारी यांनी दि.०३/०७/२०२२ रोजी खारीज केला होता. त्यामुळे सदर दावा अस्तित्वात नव्हता. दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४४/२०१२ हा वादीने सदर दावा खारीज झाल्यानंतर पुन्हा फैलावर घ्यावा म्हणून दिला होता. तो या न्यायालयाने दि.१८/०७/२०२४ रोजी मंजुर केला आहे. त्यामुळे मयत वादी क्र.१, २ व प्रतिवादी क्र.४, ९ व १३ जे सदर किरकोळ चालू असताना मयत झाले आहेत त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब दावा पुन्हा फैलावर घेण्यात आल्याने माफ करणे कायदेशीर दिसते. सबब, पुढीलप्रमाणे आदेश:-

## आ दे श

नि.क्र.९७ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो व वादी क्र.१ व २ तसेच प्रतिवादी क्र.४, ९ व १३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

PATWE DATARAJ GUNAJIRAO
Digitally signed by PATWE DATARAJ GUNAJIRAO
Date: 2025.04.04 17:29:35 +0530

दि.०४/०४/२०२५.

(डॉ. डी.जी.पटवे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इचलकरंजी.